# गोदावरी व्यवस्थापन महाविद्यालयात एम.बी.ए व एम.सी.ए इंडक्शन प्रोग्राम घेण्यात आला !

जळगाव - गोदावरी व्यवस्थापन महाविद्यालयात एम.बी.ए व एम.सी.ए इंडक्शन प्रोग्राम 2025-26 घेण्यात आला, यामध्ये सर्वप्रथम मंचावर महाविद्यालयाचे संचालक डॉ. प्रशांत वारके, डॉ. नीलिमा वारके, डॉ. चेतन सरोदे, प्रा. चारुशीला चौधरी यांना आमंत्रित करण्यात आले मंचावरील उपस्थितांचे स्वागत विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ देऊन केले.

त्यानंतर, डॉ. प्रशांत वारके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व्यवस्थापन काय असते व्यवस्थापन कसे करावे याबाबत सरांनी सविस्तर माहिती दिली, विद्यार्थ्यांनी युवा वर्गाने कम्फर्ट झोन च्या बाहेर यावे, फक्त परीक्षेसाठी विषयाचा अभ्यास न करता त्याचे प्रॅक्टिकल माहिती सुद्धा असू द्या जेणेकरून तुम्हाला उद्या कंपनीत ते कामा येईल.

गोदावरी फाउंडेशन ची थोडक्यात माहिती देखील सरांनी समोर मांडली, कंपनीत तुमची निवड ही तुमच्या गुणवत्तेवर होईल. सॉफ्टस्कील किती महत्त्वाचे आहे. एम.बी.ए झाल्यावर कोणते स्किल पाहिजे यावर सरांनी प्रकाश टाकला, एम.सी.ए झाल्यावर कोणत्या आयटी क्षेत्रात संधी आहे. इंटरव्यूची तयारी या सर्व बाबी सरांनी विद्यार्थ्यांना सांगितल्या .

विद्यार्थ्यांचे स्वागत स्वतः डॉ. प्रशांत वारके यांनी पुष्पगुच्छ देऊन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी परदेशी यांनी केले.